# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २२/१०/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील संग्राम शिवार येथे दिनांक २०/१०/२०२२ चे २३.०० वा. ते दिनांक २१/१०/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— गुंडेराव श्रावण कोईपरे वय ६० वर्षे रा. नवरगाव यांचे शेतातली टेक्समो कंपनीची दिड हॉस्पावरची किंमत ६,०००/—रू व समोर दुस—या शेतात गेले तेथे लावलेली सिआरझेड कंपनीची पाण्याची मोटारपंप दिड हॉस्पावरची किंमत ७,५००/—रू. असे एकुण १३,५००/—रू. मोटारपंप अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुरेश धुर्वे मो.नं.९९२२९३५८७८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा गरांडा शेतशिवार येथे दिनांक २०/१०/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक २१/१०/२०२२ चे ०५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— विलास मोहन शेंडे, वय ५५ वर्ष, रा. गरांडा याने गरांडा येथिल शेतात बकऱ्या बांधुन ठेवल्या होत्या. त्यामधिल २ बकऱ्या असा एकुण कि. ३५,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभाकर झोड मो. नं. ८२०८९४३८७४ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील भिवापुरकर मोहल्ला जोगीठाणापेठ उमरेड येथे दिनांक २०/१०/२०२२ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. रूपाली हरीश उटटलवार, वय ४० वर्ष, रा. भिवापुरकर मोहल्ला जोगिठाणापेठ उमरेड व आरोपी क्र. १. विजय भिवापुरकर, २. सागर भिवापुरकर ३. स्विटी भिवापुरकर सर्व रा भिवापुरकर मोहल्ला जोगिठाणापेठ उमरेड हे शेजारी राहतात. आरोपी हे नेहमी कचरा खरखटे पाणी घरासमोर टाकतात त्यावरून फिर्यादीची जाउ नी नगर परिषद चे मोबाईल ॲपवरून कचरा टाकण्याची तक्रार केली व ते नेहमी शुल्लक कारणावरून झगडा भांडण करतात. त्यामुळे मोबाईल ॲप नगरपरिषदचे दोन कर्मचारी आले व बघत होते की कुठे—कुठे कचरा पडला आहे. त्यावरून फिर्यादी व जाउ म्हणाल्या की, ही खाजगी जागा आहे, ही माझी जागा आहे. त्यावरून आरोपी क्र १ व २ नी म्हटले की तक्रार का केली यांना मी बघतो नंतर असे बोलल्या वरून फिर्यादीने म्हटले की, कचऱ्याच्या त्रासाने तक्रार केली. यावरून आरोपी क्र १ व २ यांनी मारण्याची धमकी दिली व आरोपी क्र ३ नी झगडा भांडण करीत असता तीने फिर्यादीसोबत मारपीट केली व

डोळयाचा चश्मा फोडला. त्यामुळे १३००/—रू. चे नुकसान झाले व जाउला सुद्धा ढकलढुकल केले. तसेच आरोपीतांनी फिर्यादीचे पती सागर भिवापुरकर यांना हातबुक्कीने मारहाण करून छातीला व पोटाला मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६, ४२७, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार आशिष खोडे मो.क्र. ९४२३६०५०७१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**